# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १५६ वा ❑ भारतीय सौर दिनांक ११ श्रावण शके १९४८, रविवार दि.०२ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## सुंदर नाते मैत्रीचे

– श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

**ज्योतिर्मय साहित्य**

मैत्री पाहायला गेलं तर अगदी दोन अक्षरी शब्द पण या दोन अक्षरी शब्दात जगातील सर्वात पवित्र अशी भावना लपली आहे. जगातील सर्वात सुंदर नातं कोणतं असेल तर ते मैत्रीचं नातं, कारण या नात्यात कोणताही स्वार्थ नसतो. मैत्री कधीही ठरवून होत नाही. मैत्री कशी, कधी, कोणाशी होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मैत्रीला काळाची, वेळेची, वयाची बंधने नसतात. मैत्रीत जात, धर्म, वर्ण, लिंग असा कोणताही भेदभाव नसतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणाशीही मैत्री होऊ शकते. समान छंद, समान आवडी, समान विचारधारा आणि परस्परांचे स्वभाव जुळले की मैत्री जमते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते महत्वाचे आहे. जगात मित्र नाही असा कोणताच व्यक्ती नाही. भारतात तर पौराणिक काळापासून मैत्रीला महत्व आहे. श्रीकृष्ण सुदामा यांची तर मैत्री अजरामर आहे. काळ बदलला तरी मैत्रितील पवित्र भावना आजही तीच आहे. मैत्री ही प्रामाणिक आणि तरळ भावना आहे. मित्रा समोरच आपण आपलं मन मोकळं करू शकतो. मानवी जीवनात क्षणाक्षणाला काहीना काही घडत असते. काही चांगले काही वाईट घडत असते. या बऱ्या वाईट घटनांच्या अपरिहार्यतेचा विचार करता मैत्री आणि मित्र आवश्यक असतातच. मंदिरातील देवासमोर जसे आपण आपले मन मोकळे करतो तसेच आपण आपल्या खऱ्या मित्रा जवळही आपले मन मोकळे करतो. आजकाल मैत्रीतही हिशोबीपणा आला आहे. मैत्रीतही स्वार्थ आला आहे. त्यामुळे मैत्रिची पवित्र भावना काळवंडू लागली आहे. स्वार्थाच्या अंधारात मैत्री चाचपडू लागली आहे त्यामुळे मैत्रीतून मिळणारा आनंदही कमी होऊ लागला आहे. स्वार्थी मित्र आपण सहज ओळखू शकतो. स्वतःच्या स्वार्थासाठी जवळ येणारे मित्र आपल्याला संकटकाळात मदत करत नाहीत. जो आपल्याला संकटकाळात मदत करतो तोच खरा मित्र असतो. जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात, निघून जातात पण मनाने जुळलेले मित्र मात्र कायम राहतात. मित्रांमुळे आपल्याला व्यवहार कळतो. अडचणी सुटतात, संकटावर मात करण्याचे धाडस निर्माण होते. मैत्रीमुळे आपली निर्णय क्षमता वाढते. इतकेच काय तर मैत्रीमुळेच माणूसकी जिवंत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. केवळ सहवास म्हणजे मैत्री नव्हे, सहवास आणि मैत्री यात फरक आहे. सहवासाने मैत्री फुलत जाते हे जरी खरे असले तरी मैत्रीसाठी मित्र दररोज जवळ असावाच असे काही नाही. अनेकदा जिवलग मित्र जवळ नसतात. कित्येक दिवस त्यांच्यात बातचीत होत नाही तरीही त्यांची मैत्री कायम असते अगदी श्रीकृष्ण सुदाम्या सारखी. पु .ल. देशपांडे यांनी मैत्री विषयी एक फार सुंदर कविता लिहिली आहे. ते लिहितात रोज आठवण व्हावी असे काही नाही. इतकंच काय रोज बोलणं व्हावं असंही काही नाही. पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री. अशी सरळ सोपी पण घट्ट मैत्री टिकवणं, निर्माण करणं फार कठीण नाही आणि फार सोपंही नाही. मनाचा एवढा हळवेपणा नवरा बायकोच्या नात्यामध्ये नाही हो येत, तिथे मित्रच असावा लागतो. कारण इतर कोणत्याही नात्याला आपण नाव दिले की, त्याबरोबर कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक बंधने येतात. या नात्याला मात्र कसले नाव नाही त्यामुळे कसली बंधनंही नाहीत किंबहुना ती तशी नसावीतही. मित्रांशी वाट्टेल त्या विषयावर आपण गप्पा मारू शकतो, मोकळे होऊ शकतो, तिथे स्त्री – पुरुष, जात – पात, वय काही आडवे येत नाही. मनसुबा बनून जातो आणि मन आनंदी होतं. शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी माणसातलं माणूसपण जाणलं. पु ल नी मैत्री विषयी किती छान शब्दात लिहिलंय. मैत्री अशीच असते अगदी सुंदर. ज्याने मैत्रीचे सुंदर नाते जपले त्याचे जीवन आनंदाने फुलून गेले. मैत्रीसारखे सुंदर नाते या जगात दुसरे कोणतेही नाही, ज्याला मैत्री समजली त्याला जीवन समजले.

# अजित डोवाल यांचे राष्ट्रसेवेतील योगदान प्रेरणादायी-केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

### लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रदान

### अजित डोवाल यांचा सन्मान हा राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा देत राष्ट्रवाद, शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक जागृतीचा भक्कम पाया रचला. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' हा त्यांचा विचार आजही प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देत असून विकसित आणि सक्षम भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.




लोकमान्य टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित समारंभात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रतिष्ठेचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार तथा पुरस्काराचे मानकरी अजित डोवाल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, डॉ. गीताली टिळक, डॉ. प्रणिती टिळक आदी उपस्थित होते.

अमित शाह म्हणाले, लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्याला जनआंदोलनाचे स्वरूप देत सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवांच्या माध्यमातून सांस्कृतिक राष्ट्रवादाची भावना जनमानसात रुजविली. 'केसरी' आणि 'द मराठा' या वृत्तपत्रांद्वारे निर्भीड पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला, तर राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून देशभक्त नागरिक घडविण्याचे ऐतिहासिक कार्य केले.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या कार्याचा गौरव करतांना श्री. शाह म्हणाले, देशाच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षेला बळकटी देण्यात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. गुप्तचर यंत्रणेत अनेक आव्हानात्मक मोहिमा यशस्वीपणे पूर्ण करत त्यांनी राष्ट्रसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि निर्णायक बनविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अनेक धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीत त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी त्यांची झालेली निवड अत्यंत योग्य असून त्यांच्या कार्यातून देशातील तरुणांना राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळेल, असा विश्वासही शाह यांनी व्यक्त केला.

**राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी अजित डोवाल यांची झालेली निवड ही राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव आहे. २०१४ पासून राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून त्यांनी भारताच्या सुरक्षा धोरणाला नवे परिमाण दिले. त्यांच्या 'प्रोॲक्टिव्ह डिटरन्स' च्या संकल्पनेमुळे भारताची सुरक्षा रणनीती अधिक प्रभावी झाली आहे. भारत आता केवळ हल्ले सहन करणारा देश नसून आवश्यकतेनुसार ठोस प्रत्युत्तर देण्याची क्षमता असलेले सामर्थ्यवान राष्ट्र बनल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकमान्य टिळकांनी १८५७ नंतर भारतीय समाजात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना चेतवून राष्ट्रवादाला नवी दिशा दिली, ते भारतीय राष्ट्रवादाचे जनक होते. टिळकांनी इंग्रजी साम्राज्याच्या काळात भारतीयांची मानसिकता बदलत त्यांच्या मनात देशभक्तीच्या भावनेचे रोपण केले. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंतीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्याचे कार्य त्यांनी केले. राष्ट्रहितासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या व्यक्तीलाच लोकमान्य टिळक यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे उचित असून अजित डोवाल हे त्या परंपरेला साजेसे व्यक्तिमत्त्व असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**युवकांनी समर्पण, त्याग आणि कर्तव्यभावनेने विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे–अजित डोवाल**

पुरस्कार स्वीकारल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, समाजजागृती आणि विचारप्रबोधनाचे कार्य आजही तितकेच प्रेरणादायी असल्याचे सांगितले. हा पुरस्कार स्वीकारणे हा आपल्या आयुष्यातील मोठा सन्मान असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी विकसित, आत्मनिर्भर आणि शक्तिशाली भारताच्या निर्मितीसाठी लोकमान्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकमान्य टिळकांनी दिलेला स्वराज्याचा विचार आज राष्ट्रीय सुरक्षेच्या बळकटीत अधिक प्रभावीपणे प्रतिबिंबित होत असल्याचे सांगितले. देशाच्या सीमा, अंतर्गत सुरक्षा आणि गुप्तचर व्यवस्थेला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्यात अजित डोवाल यांचे योगदान अतुलनीय असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांना मिळालेला पुरस्कार देशाच्या सुरक्षा यंत्रणा, सशस्त्र दल आणि राष्ट्रसेवेला वाहिलेल्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान असल्याचे श्री. शिंदे म्हणाले.

डॉ. रोहित टिळक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. १९८६ मध्ये लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराला सुरुवात करण्यात आली असून राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या कार्यासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. श्री. डोवाल यांना देशाच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या बहुमूल्य योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## बांध !

**ज्योतिर्मय साहित्य**

मी युगान युगाची विरहिणी! सागर मिलनाची आस असलेली! अनंत काळापासून !

नाही आवडत मला, माझ्या वर बांध घातलेले! मला वाहू द्या माझ्या मनाप्रमाणे !निरागसपणे! अविरत! अखंड !सागराकडे !!जो बाहू पसरून कधीची माझी वाट बघत आहे !



घाला बांध माझ्यावर ,कितीही, पण माझ्या मनावर बांध घालू शकत नाही कोणी !ते तर कधीच सागरा कडे जाऊन त्याच्या बाहुपाशात विसावले आहे .!!जेव्हा त्याची ओढ अनावर होते, तेव्हा मी माझे मित्र काळे मेघ, यांना मदतीला साद घालते आणि तेही तेवढ्याच तत्परतेने येतात. कदाचित माझी स्थिती पाहून त्यांचे त्यांना अश्रू थोपविता येत नसावे आणि ते बरसताता,वर्षाव करताता... तेव्हा बांधकाम विशारद म्हणतात,''बांधाचे दरवाजे उघडण्याची वेळ आली आहे, हे ऐकून माझे कान तृप्त होतात !

मी प्रियकराला भेटायचे म्हणून तयारीला लागते. खूप खूप बोलायचे असते .कमी वेळात! त्याची एकदा उजळणी करून घेते आणि तो क्षण येतो ज्याची मी आतुरतेने वाट बघत असते!! दरवाजे धडकन उघडतात मी बेभान धावत सुटते,.. माझ्या पायाचे मलाच ओझे वाटते... पण मी धावत असते. माझ्या भेटीसाठी आसुसलेला तोही !तो आपले भरभक्कम बाहू पसरतो... आणि त्याच्या बाहुपाशात मी विरघळत जाते,.. स्वतःचे अस्तित्व विसरते! एकरूप होते !!




पण ह्या मिलानाला मात्र चंद्र साक्षी नसतो !कारण तो फक्त नश्वर प्रेमीयुगल यासाठीच आपले चांदणे पसरत असतो!!

आमच्या अमर प्रेमासाठी काळे मेघ असतात, दिलासा देतात!मध्येच कधीतरी वीज चमकते.

त्या प्रकाशात मला दिसतात ते माझ्या प्रियकराचे सागराचे अथांग डोळे, ज्यात माझ्यासाठी फक्त माझ्यासाठी प्रेम सामावलेले असते !आणि आणि माझ्यावर कधी तरी बांध घातले होते, हे देखील मी विसरते!





ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ

Sanjay Vyapari

Scan to pay with any UPI app

नवोदित साहित्यिकांसाठी सुवर्णसंधी

ज्योतिर्मय साहित्य महाराष्ट्रातील सर्व नवोदित लेखकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ म्हणून पुढे येत आहे. फक्त साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील एकमेव ई-दैनिक ज्योतिर्मय साहित्य हे आहे.

मागील दीड वर्षात या व्यासपीठावरून साधारण 150 + साहित्यिक तयार झाले आहेत आणि ही संख्या दररोज वाढत आहे.

नवोदित साहित्यिक या व्यासपीठावरून बिनधास्त लेखन करू शकतो कारण त्यांना योग्य मार्गदर्शन करणारी टीम येथे आहे. याचा अनुभव मागील वर्षात अनेक साहित्यिकांनी घेतला आहे. त्यांचे साहित्य या व्यासपीठावरून त्यांचा फोटो व मोबाईल क्रमांकासह देण्यात येते. त्यामुळे वाचक त्यांच्याशी थेट संपर्क करू शकतो.

ज्योतिर्मय च्या व्यासपीठावरून कोणीही आपले विचार मांडू शकतो, त्यांच्यासाठी अट फक्त एकच आहे. त्यांना रुपये पाचशे भरून वार्षिक सदस्यता घ्यावी लागते, नंतर ते वर्षात संपूर्ण 365 दिवस या व्यासपीठाचा वापर करू शकतात.

मित्रांनो मग वाट कसली बघता लगेच ज्योतिर्मय साहित्य चे मेंबर व्हा व लिहिण्यास सुरुवात करा, तुमचे उज्वल भवितव्य लवकरच येथे घडणार आहे.

@ संजय व्यापारी,
संपादक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे
वार्षिक वर्गणी 7743918559 या नंबरवर किंवा दिलेल्या QR Code वर ऑनलाईन पाठवा. व पैसे भरल्याचा स्क्रिनशॉट पाठवा.




# जात्यावरच्या ओव्या.....

निज निज बाळा
गायी वासर निजले
चांद तारे लुकलुक
तुला सांगून थकले ||७७४||

चल चल मह्या जीवा
तुला कशाचा आराम
देह संसाराचा दास
मुखी नाम, कर काम ||७७५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५८




**ज्योतिर्मय साहित्य**

माणूस वृद्ध झाला, इंद्रिये थकली तरी देखील माणूस त्यातून बाहेर पडत नाही. शेवटपर्यंत विषय वासना त्याला त्रास देतच असतात. एखादी गोष्ट प्रत्यक्षात मिळाली नाही की मग तो कल्पनेच्या राज्यात रमतो, कल्पनेचे मनोरथ करू लागतो. आजच्या काळात तर टीव्ही, मोबाईल, सोशल मीडिया या सगळ्या आभासी गोष्टी कल्पनेच्या राज्यात माणसाला गुंतवून ठेवतात.

मग या सर्व गोष्टीतून सुटका करून घेण्याचा काही उपाय आहे का ? निश्चितच आहे ! समर्थ म्हणतात,''आपण निष्कामपणे रामाची चिंतन करावे, त्याचे ध्यान, मनन, चिंतन, पूजा करावी. हे सर्व संस्कार आहेत. त्यातून हळूहळू वाईट विषयांची कामना कमी होत जाते, मनामध्ये सद्वासना निर्माण होतात आणि शेवटी निर्वासना अवस्था निर्माण होऊन साधक मोक्षापर्यंत पोहोचतो. असा त्याचा प्रवास वाईटाकडून चांगल्याकडे होऊ शकतो.



पण इथे समर्थ आपल्याला निष्काम भक्ती करायला सांगतात हे लक्षात घ्यायला हवे. आपण सामान्य माणसे परमेश्वराची भक्ती देखील काहीतरी हेतू किंवा इच्छा मनात धरून करीत असतो. त्यामुळे आपली वासना शेवटपर्यंत सुटत नाही. हे ईश्वरा, मला अन्य काही नको. फक्त तू हवा आहेस अशा प्रकारची आर्तता जेव्हा भक्तीत येईल, तेव्हा आपली वाटचाल मोक्षमार्गाकडे व्हायला सुरुवात होईल.

या ठिकाणी संत ज्ञानेश्वरांचा अरे अरे ज्ञाना झालासी पावन हा अभंग आठवतो. त्यात ते म्हणतात,

वृत्तीची निवृत्ती आपणा सकट ।अवघेची वैकुंठ चतुर्भुज ।।

जेव्हा साधकाची आध्यात्मिक दृष्ट्या प्रगती होऊ लागते, तेव्हा त्याच्या वृत्तीची निवृत्ती होऊ लागते. ती देखील कशी? तर आपणा सकट म्हणजे त्याचा मी पणा, अहंकार सगळे काही नष्ट होते आणि संपूर्ण वैकुंठच त्याला विष्णूरूप दिसू लागते. कामना, वासना सर्वच गोष्टी नाहीशा होतात. कल्पनेचा लवलेश देखील राहत नाही आणि मग आपोआपच जन्ममृत्यूच्या चक्रातून देखील त्याची सुटका होते.


स्वसंवाद : १) माझ्या मनात वारंवार येणाऱ्या कोणत्या इच्छा हळूहळू वासनांमध्ये रूपांतरित होत आहेत?

२) ''मला हे हवेच आहे'' असे वाटते तेव्हा मी त्यामागचा विचार करतो का?

३) मी एखादी गोष्ट मिळाली नाही तर अस्वस्थ होतो का, की शांत राहू शकतो?

४) माझ्या आयुष्यात कल्पनाविलास (दिवास्वप्ने / आभासी जग) किती प्रमाणात आहे?

५) मी दररोज किमान काही वेळ निष्काम भावाने नामस्मरण किंवा चिंतन करतो का? **(क्रमशः)**




## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559




✍ अस्तित्व

अस्तित्व म्हणजे कामातून निर्माण होणारी ओळख, ते निर्माण करण्यासाठी आपले काम इतरांपेक्षा वेगळे पाहिजे जे आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करेल.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# तळमळ लागल्यावर गुरुभेट निश्चित !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

काय करावे हे मनुष्याला कळते, पण त्याचे मन त्याला आवरत नाही. विषयाचा उपभोग घेताना आपले मन त्यामध्ये रंगून जाते, आणि त्याचे सुखदुःख निस्तरताना मात्र आपली भ्रमिष्टासारखी चित्तवृत्ती होते. आपल्याला झालेला भ्रम नाहीसा करायला तीन गोष्टी आवश्यक आहेत : एक सद्विचार, दुसरी नामस्मरण, आणि तिसरी सत्संगती.

संत ओळखणे फार कठीण आहे. आपण त्याच्यासारखे व्हावे तेव्हांच तो कळायचा. त्यापेक्षा सद्विचार बाळगणे सोपे. भगवंताचा विचार तोच सुविचार होय. भगवंताच्या कथा ऐकाव्यात, त्याच्या लीला वर्णन कराव्यात, त्याच्या वर्णनाचे ग्रंथ वाचावेत, पण याहीपेक्षा, आपल्याजवळ राहणारे असे त्याचे नाम घ्यावे. तुम्ही नेहमी नाम घेत गेलात, तर तुम्हाला संत धुंडीत जाण्याची जरूर न पडता, संतच - अगदी हिमालयातले संत, तुम्हाला धुंडीत येऊन तुमचे काम करतील. अहो, खडीसाखर ठेवली की मुंगळ्यांना आमंत्रण करायला नको ! तुम्ही म्हणाल, आम्हाला ते करता येत नाही. पण आपण आपल्या मुलाला शाळेत घालतो, आणि तो न शिकला किंवा त्याला अभ्यास येत नसला, तर पुन्हा त्याच वर्गात त्याला बळजबरीने ठेवतोच की नाही ? त्याला एखादी विद्या आली नाही, तर दुसरी कोणती येईल ती शिकवतोच की नाही ? आणि त्याने आपल्या पोटापाण्याची व्यवस्था करायला तयार व्हावे म्हणून आपल्याला तळमळ लागतेच की नाही ? तशी परमेश्वर मिळावा म्हणून आपल्याला तळमळ लागली आहे का ? तशी तळमळ लागली म्हणजे तुमचा गुरू प्रत्यक्ष जमिनीतून वर येईल. तो सारखा तुमच्याकरिता वाट पाहात असतो.

आई मुलाची फार तर एक जन्मापर्यंत, म्हणजे देह आहे तोपर्यंतच काळजी करील; पण गुरू हा जन्मोजन्मी तुमची काळजी घ्यायला तयार आहे. त्याला देह नसला, तरी तो नाही असे समजू नका. तुम्ही दुश्चित्त झाला म्हणजे तो दुश्चित्त होतो. म्हणून तुम्ही केव्हांही दुश्चित्त होऊ नका. देहाचे भोग येतील-जातील, पण तुम्ही सदा आनंदात राहा. तुम्हाला आता काही करणे उरले आहे असे मानू नका. गुरुभेट झाली म्हणजे तुम्ही तुम्हीपणाने उरतच नाही. मात्र, गुरूला अनन्य शरण जा. एक शिष्य मला भेटला, तेव्हा तो आनंदाने नाचू लागला. मी त्याला विचारले, ''तुला एवढा कसला आनंद झाला आहे ?'' त्यावर तो म्हणाला, ''मला आता आनंदाशिवाय दुसरे काही उरलेच नाही, कारण मला आज गुरू भेटले !'' जो असा झाला, त्यालाच खरी गुरूची भेट झाली. तरी, तुम्ही गुरूला अनन्य शरण जा, म्हणजे तुम्ही आणखी काही करण्याची जरूरी नाही.

भगवंताची तळमळ हा साधकपणाचा प्राण आहे.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### तुज सगुण म्हणु की निर्गुण रे?

आपल्यातील रजो गुण, आणि तमो गूण संपूर्णपणे जाऊन त्या ऐवजी सत्वगुण ही शुद्ध व्हावा लागतो तरच आत्म दर्शन होत असते. हे वाक्य आपण
अध्यात्माच्या चर्चेदरम्यान ऐकत असतो.
याबरोबरच आपण असेही ऐकतो की, ब्रह्मदेव हे रजोगुणी आहेत.
भगवान महादेव हे तमोगुणी आहेत.
काली माता ही तमोगुणी आहे तर,
लक्ष्मी माता ही रजो गुणी आहे.
आपल्याला असा प्रश्न साहजिकच पडतो की, या वरील देवता या भगवंताच्या अंश रूप आहेत,
आपल्यासारख्या सामान्य माणसाला रजो गुण आणि तमोगुण आणि सत्वगुण यात असताना आत्म दर्शन होत नाही, तर मग हे वर वर्णन केलेले देवता रजोगुणी आणि तमोगुणी असतानाही ते भगवंताचे अंश कसे? मग आपल्यासारख्या सामान्य माणसाची, या गुणांमुळे आपली उपेक्षा का व्हावी?
हा प्रश्न पडल्यानंतर आपण त्यास सोडविण्याचाही प्रयत्न करू.
या प्रश्नाचे उत्तर समजण्यासाठी गुण हे दोन स्तरावर समजून घ्यावे लागतात १) व्यावहारिक:- सृष्टीच्या कार्यासाठी असलेले गुण. (क्रमशः)

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "घास सानुले व गुरू"

काही दिवसापूर्वी आपण गुरूपौर्णिमा साजरी केली.
"गुरूचरणारविदार्पणमस्तू"
अबब, या एका शब्दाचा अर्थ आणि फोड करून सांगतो व नतंर गुरूबद्दल. तर वाचकहो, वरील शब्दाचा अर्थ आहे, मी गुरूचरणाला वंदन करून माझे सर्वस्व चरणावर अर्पण करतो. तर गुरू किती मोठी व्यक्ती आहे माणसाच्या जीवनात, नाही का? प्रत्येक क्षेत्रात वरचे स्थान! श्रीदत्तप्रभूनी या चराचरातील 24 गुरू केले. आपण तर मानव. ब्रम्हा विष्णू महेश याचे रूप म्हणजे गुरू. व्यासाचे चिंतन आपण करतो, तर मुख्य ग्रंथ वेदाचे विभाजन करून ते पुढील पिढ्याला सुलभ केले. श्रीकृष्णाने अर्जुनाला जो उपदेश केला तो सुद्धा सर्व जनापर्यत आणण्याचे काम व्यासांनी केले! असीच एक गुरूसाठी केलेली प्रार्थना व गुरूचे कार्ये अधोरेखित केलेली स्वामी स्वरूपानंदासाठी प्रार्थना अशीच आहे. जवळ घेऊनी शिकवा गीता, ओढ अशी लागली/घास सानुले करूनी भरवा आम्हा माऊली!!" यात गुरूलाच माता मानून लेकराला काय पचेल, काय पोषक आहे, कशा पद्धतीने ते त्याच्या मुखी ध्यायचे हे गुरूच करू जाणे! ज्याच्या त्यांच्या क्षमतेनुसार गुरू घडवून आणतात. गुरू मानसिक आत्मिक समाधान देतात. म्हणून या दिवसी प्रत्येकाच्या आयुष्याला आकार देणारे, पंखात बळ देणारे ह्या गुरूचरणी नतमस्तक होऊनी त्याच्या प्रती कृतज्ञता दाखवू या. आज एवढे पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे.



# पावसाळ्यात होणाऱ्या चिखल्या

**ज्योतिर्मय साहित्य**

बोटांच्या बेचक्यात होणारे बुरशीचे इन्फेक्शन.

घाण पाणी, ओले मोजे, घामामुळे होते.

साथीचा आजार आहे - त्यामुळे दुसऱ्याचे मोजे-चप्पल वापरू नका.

लक्षणे : बोटांमधली त्वचा पांढरी पडणे, सोलणे

- असह्य खाज + जळजळ - रात्री जास्त
- त्वचा कडक होऊन भेगा पडणे, रक्त येणे

उपाय : जास्त झाल्यास पाणी/पू भरलेले फोड.

१. कोरडे = सेफ: अंघोळीनंतर बोटांच्या बेचक्या टिश्यूने दाबून पुसा. हेअर ड्रायरची थंड हवा मारा.

२. मोजे रोज बदला: फक्त १००% सुती मोजे. ओले झाले की ताबडतोब बदला.

३. चप्पल-बूट : पावसातून आल्यावर उन्हात/पंख्याखाली २४ तास वाळवा. आत न्यूजपेपर भरून ठेवा.

४. पावडर : बूटात, बोटांत अँटी - फंगल पावडर टाका.

नियम : खाज थांबली तरी २ आठवडे लावत रहा. बुरशी मुळापासून मरते.

डॉक्टरांकडे धाव घ्या जर:

- पू, रक्त, दुर्गंधी + ताप असेल तर
- डायबेटिस असेल तर
- नखे पिवळी-जाड झाली तर
- २ आठवडे क्रीम लावूनही फरक नाही, तर.

पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे पोटदुखी, जुलाब, टायफॉइड किंवा काविळीसारखे आजार होण्याचा धोका खूप जास्त असतो.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

त्यामुळे या दिवसांत पाणी शुद्ध करून पिणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पावसाळ्यात पाणी शुद्ध करण्याच्या आणि ते सुरक्षितपणे पिण्याच्या काही सोप्या व प्रभावी पद्धती खालीलप्रमाणे आहेत:

१. पाणी शुद्ध करण्याच्या सोप्या पद्धती

- पाणी उकळणे (सर्वात उत्तम उपाय):- पाणी कमीत कमी *१० ते १५ मिनिटे* कडकडवून उकळावे. उकळल्यामुळे पाण्यातील सर्व प्रकारचे हानिकारक जिवाणू आणि विषाणू नष्ट होतात. पाणी उकळल्यानंतर ते थंड होऊ द्या आणि नंतरच गाळून वापरा.
- तुरटी फिरवणे: जर पाणी खूप गढूळ असेल, तर पाण्यात स्वच्छ धुतलेली फिटकी २-३ वेळा गोल फिरवावी. यामुळे पाण्यातील माती आणि गाळ खाली तळाशी बसतो. वरचे स्वच्छ पाणी नंतर दुसऱ्या भांड्यात काढून उकळून घ्यावे.
- क्लोरीनच्या गोळ्या किंवा लिक्विड ():* पूर किंवा जास्त पावसाच्या काळात विहिरीचे किंवा नळाचे पाणी जंतूमुक्त करण्यासाठी क्लोरीनच्या गोळ्या किंवा थेंबांचा वापर करता येतो. साधारण १ लिटर पाण्यासाठी डॉक्टरांनी किंवा औषध दुकानात सांगितलेल्या प्रमाणातच याचा वापर करावा आणि पाणी अर्ध्या तासानंतर प्यावे. **(क्रमशः)**

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी
संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### दरवळ

सुप्रभातीच्या काकड आरतीने
मन प्रसन्न होवून
भक्तीचा दरवळ पसरतो
नव चैतन्याच्या बहरात
घर अंगणासह सर्वजण
भक्तीरंगात भक्त रंगतो

काव्यशब्दांची गुंफता माळ
सुंदर,सुगंधी काव्य
जन्मास पहा येते
किमया खरी शब्दांची
वाचन करता सर्वांच्या
मनाला आनंद देते

# ''संत रोहिदास महाराज स्वातंत्र्य, समता व श्रमप्रतिष्ठेचे दीपस्तंभ - रवींद्र किरकोळे

ज्योतिर्मय साहित्य

पुणे - ''संतश्रेष्ठ रोहिदास महाराजांनी तत्कालीन विषम सामाजिक व्यवस्थेतील वेदनांना निराशेचे रूप न देता त्या आपल्या वाणीचे, विचारांचे आणि भक्तीचे सामर्थ्य बनविले. त्यांच्या शब्दांतून केवळ एका संताचे जीवन व्यक्त होत नाही, तर शोषित, वंचित आणि श्रमजीवी समाजाच्या वेदनांना आवाज मिळतो.त्यांनी श्रमाला ईश्वरपूजेचे स्थान दिले आणि कष्ट हेच खरे वैभव हा जीवनमंत्र जगासमोर ठेवला.त्यामुळे संत रोहिदास महाराज हे श्रमप्रतिष्ठेचे चिरंतन प्रतीक ठरले, ''असे प्रतिपादन अखिल भारतीय सामाजिक समरसता गतिविधीचे सहसंयोजक रवींद्र किरकोळे यांनी केले.''श्री महागणेश अधिष्ठान विश्वस्त न्यास, पुणे'' ( महाराष्ट्र ) व ''सामाजिक समरसता मंच'' महाराष्ट्र गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने संत शिरोमणी सद्गुरू श्री रोहिदास महाराज यांच्या ६५० व्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित ''कीर्तनप्रवचनव्याख्यान महोत्सव'' आणि ६५१ पुष्प समर्पण अभियान संकल्प समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.न्यू इंग्लिश स्कूलच्या गणेश हॉलमध्ये हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.रवींद्र किरकोळे पुढे म्हणाले, ''संत रोहिदास महाराजांच्या दृष्टीने माणसाचे मोठेपण जन्मावर किंवा जातिव्यवस्थेवर नव्हे, तर कर्म, चारित्र्य आणि अंतःकरणाच्या निर्मळतेवर अवलंबून होते.धार्मिक व आध्यात्मिक अधिकार हा बाह्य कर्मकांडात नसून अंतःकरणाच्या शुद्धतेत असतो, हे त्यांनी आपल्या आचरणातून




सिद्ध केले. त्यांनी भक्तीला समता, मानवता आणि आत्मसन्मानाची दिशा दिली. त्यामुळे त्यांचे जीवन सामाजिक परिवर्तन आणि आध्यात्मिक क्रांतीचे तेजस्वी उदाहरण ठरते. ''त्यांनी संत रोहिदास महाराजांच्या स्वातंत्र्यवादी विचारांवरही प्रकाश टाकत सांगितले की,''त्या काळातील पारतंत्र्य, सामाजिक गुलामी आणि अन्यायाविरुद्ध स्वातंत्र्याचा पहिला निर्भय स्वर संत रोहिदासांच्या वाणीतून उमटतो.पराधीन जीवन हे मानवी प्रतिष्ठेला कलंक आहे, अशी त्यांची ठाम भूमिका होती. जो पारतंत्र्यात राहतो, तो उपवासालाच पात्र ठरतो या विचारातून त्यांनी स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित केले. ''संत रोहिदासांचे साहित्य लोकभाषेत आणि बोलीभाषेत असल्यामुळे ते थेट जनमानसाशी संवाद साधते, असे सांगत त्यांनी त्यांच्या प्रत्येक दोह्यातून समता, श्रमाचा गौरव,भक्तीची निर्मळता आणि सामाजिक न्यायाचा संदेश प्रकट होत असल्याचे नमूद केले.''संत रोहिदास महाराज आजही केवळ एका समाजाचे नव्हे,तर संपूर्ण मानवजातीच्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या विचारांचे चिरंतन दीपस्तंभ आहेत''असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाची सुरुवात ह.भ.प.मोरेश्वर जोशी चऱ्होलीकर यांच्या संत रोहिदास महाराजांवरील भावस्पर्शी कीर्तनाने झाली.समरसता गतिविधीचे महाराष्ट्र-गोवा क्षेत्र सदस्य निलेश गद्रे यांनी प्रास्ताविक केले,तर ॲड आनंद गवळी यांनी संत रोहिदासांच्या विचारांचे समकालीन संदर्भांसह विशेष मार्गदर्शन केले.यावेळी व्यासपीठावर ॲड आनंद गवळी, ह.भ.प.मोरेश्वर जोशी चऱ्होलीकर आणि मुकुंद आफळे उपस्थित होते. तसेच रवी ननावरे, गीतेश जोशी, डॉ प्रसाद खंडागळे, अविनाश देशपांडे, अनिल भस्मे, गोरख शिंदे, विलास लांडगे, दत्ताजी वाळवेकर,राजेश मठपती,शरद शिंदे, ॲड मुकुंद यदमळ, डॉ.माणिक सोनावणे, धनंजय खुडे, विकास माने, सुरेश महाले, प्रतिभा कुलकर्णी, ॲड एकनाथ जाविर,शुभांगी पोटभरे, विलास देशपांडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महोत्सवानिमित्त संत रोहिदास महाराजांवरील माहितीपूर्ण पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.तसेच कार्यकारी मंडळ,कीर्तनकार आणि चरणसेवकांना सन्मानित करण्यात आले.मान्यवरांनी संत रोहिदास महाराजांच्या जयंती वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या धार्मिक, सामाजिक,सांस्कृतिक आणि प्रबोधनपर उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.धनंजय भिसे यांनी केले,तर आभार मुकुंद आफळे यांनी मानले.

''संतश्रेष्ठ रोहिदास महाराजांनी भारतीय समाजाला समता, मानवता आणि निर्मळ भक्तीचा कालातीत संदेश दिला.त्यांनी स्त्रीचा सन्मान हा समाजाच्या नैतिकतेचा पाया मानला. मोगलांच्या काळात धर्मांतराच्या प्रवृत्तीला त्यांनी निर्भीडपणे विरोध करत स्वधर्म,स्वाभिमान आणि अध्यात्मिक मूल्यांचे रक्षण केले.

त्यांच्या विचारांना समाजातील सर्व स्तरांतून स्वीकार मिळाल्याने त्यांची शिष्यपरंपरा हिंदू धर्मातील विविध जाती-जमातींमध्ये विस्तारली.त्यांच्या वाणीतील सार्वत्रिक मानवतावादामुळेच त्यांच्या पवित्र रचनांना शीख धर्माच्या पवित्र गुरु ग्रंथ साहिबमध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले.

संत रोहिदास यांनी कर्मकांड,जातिभेद आणि बाह्य आडंबर यांना विरोध करून अंतःकरणातील शुद्धता, प्रामाणिक श्रम आणि निर्मळ भक्ती यांनाच खऱ्या अध्यात्माचे अधिष्ठान मानले.त्यांच्या वाङ्मयातून स्वातंत्र्य,समता, बंधुता,सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठा या मूल्यांचे बीजारोपण झाले.त्यामुळे संत रोहिदास महाराज हे केवळ संतकवी नव्हते,तर सामाजिक समरसता आणि मानवमुक्तीचे महान प्रणेते होते.''

**-निलेश गद्रे**
सदस्य, समरसता मंच, महाराष्ट्र व गोवा

# बदल स्वीकारणे गरजेचे

ज्योतिर्मय साहित्य

पात्रता नसलेल्या व्यक्तींचा सहवास टाळावा सर्वच व्यक्तींमध्ये सर्वच प्रकारची योग्यता असते असे नव्हे. काही व्यक्तींमध्ये काही विशिष्ट गुण असतात. परंतु आपल्या एखाद्या विशिष्ट दृष्टीने ते अयोग्य असतात. योग्यता आणि अयोग्यता याचे मानक व्यक्ती, स्थळ, काळ, उपयुक्तता, प्रासंगिकता अशा अनेक कारणपरत्वे बदलतात.

वर्तमान परिस्थिती परिवर्तनाचे युग आहे. पूर्वी बदल व्हायचे परंतु ते मंद गतीने. आज बदल होतात पण ते अत्यंत वेगाने, गतीने. या बदलाच्या गतीनुसार प्रत्येकाच्या अपेक्षा, आवश्यकता, अनिवार्यता बदलत आहेत. म्हणूनच प्रत्येकाची जीवनशैली देखील बदलत आहे. त्यामुळे कोणी अमुक व्यक्तीने एखाद्या परिस्थितीत आपल्या मनाप्रमाणे चालावे, वागावे हे आज अयोग्य ठरत आहे.

पन्नास वर्षांपूर्वीच्या काळातील राहणीमान आणि आजच्या काळात असलेल्या जीवनशैलीत मोठ्या प्रमाणावर बदल झालेला दिसून येत आहे. त्यामुळे आजचे स्वाभाविक वर्तन हे वर्तमानातील सहज संस्कार बनले आहे. पूर्वीच्या वळणाने संस्काराने चालणारे खूप कमी व्यक्ती उरलेले असताना त्यांना हे न पटणे स्वाभाविक आहे. पिढीगत अंतर म्हणजेच जनरेशन गॅप हा मोठ्या दरीच्या स्वरूपामध्ये या ठिकाणी निदर्शनास येतो.

© बलराज संघई
(एम.ए. अहिंसा शांति शोध)
छत्रपती संभाजीनगर
9420015108



पूर्वेकडील देशांमध्ये याबाबतीत खूप मोठे बदल फार पूर्वी घडून गेलेले आहेत. तेथील सभ्यता आणि संस्कृती आता वेगळी आहे. या तुलनेमध्ये पूर्वे कडील देशात म्हणजेच भारतामध्ये अजून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर भारतीय सभ्यता आणि संस्कृती टिकून आहे. परंतु जग चालले आहे त्या गतीने चालण्याचा प्रयत्नही नवीन पिढी करत आहे. हे संतुलन या ठिकाणी मला फार महत्त्वाचे वाटते. बदल स्वीकारायचा आणि संस्कारही विसरायचे नाहीत हे फार मोठे वाण किंवा व्रत आहे. नवीन पिढीने याचा स्वीकार केलेला आहे. कमी अधिक प्रमाणात का होईना आपल्या देशांमधील नवीन पिढीत काही संस्कार, काही मूल्य आजही विद्यमान आहेत ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

काही व्यक्तींना दुसऱ्याचा उत्कर्ष ही सहन होत नाही. काही व्यक्ती दुसऱ्यांच्या विकासामध्ये, सफलतेमध्ये सतत बाधा बनतात. असे व्यक्ती स्वतःच्या उन्नती बद्दल सुद्धा उदासीनच असतात. कारण त्यांची शक्ती वेळ सतत दुसऱ्याचा बाबत विचार करण्यामध्येच खर्च होते. अशा प्रकारचे योग्यता आणि पात्रता नसलेल्या व्यक्तींचा सहवास टाळावा. आपल्या भविष्याच्या दृष्टीने हे योग्यच.

आज जगाच्या बरोबरीने चालायचे असताना प्रत्येकाला सहवास देखील त्या पद्धतीचाच असावा हे अयोग्य नाही. अत्यंत गतीने होणारी प्रगती आपल्यातही व्हावी प्रयत्न देखील चुकीचा नाही. म्हणून यात अडथळा निर्माण करणारे व्यक्ती कोणी टाळत असेल तरीही ते ठीकच म्हणावे लागेल. त्यामुळे असे वाटते की आज हा आग्रह कालबाह्य होतो की मला गृहीत धरले नाही, मला टाळले. हे टाळणे एखाद्याच्या दृष्टीने अयोग्य असले तरी दुसऱ्याच्या दृष्टीने ते योग्य असू शकते. कारण त्या ठिकाणी त्याची ती आजची आवश्यकता असते आणि अनिवार्यता देखील.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त महापुरुषांना अभिवादन !

ज्योतिर्मय साहित्य

छ. संभाजीनगर - महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री. मनोज अग्रवाल यांनी भूषवले. विद्यार्थ्यांनी छान, आत्मविश्वासंपूर्वक भाषणे केली. सर्व विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. श्रीमती दीपाली औटे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इयत्ता सातवीच्या विद्यार्थीनी अनुष्का ब्राम्हणे व अनन्या साळवे यांनी सूत्रसंचालन केले.




कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षिका सौ. संगीता अंबेकर, श्रीमती सुनीता पाटील, श्रीमती वैशाली सुरडकर, श्रीमती मंगला महाजन, श्रीमती अंजली कुलकर्णी, श्रीमती स्वाती घोडतुरे, श्रीमती दीपाली औटे, श्रीमती शिल्पा बहुरे, श्रीमती वैशाली देशमुख, श्रीमती मंजुश्री राठोड, मा. श्री. वेंकट जाधव,मा. श्रीमती शुभांगी चव्हाण श्री. दीपक पडोळ, श्री. संदिप कळंबे श्री. सागर मगरे, श्री.ज्ञानेश्वर असोलकर श्रीमती पल्लवी क्षीरसागर, श्री. प्रितीश सराटे, श्री. सुशील दांडगे, श्रीमती फिरदोस नदाफ, श्रीमती सबासदफ सिद्दीकी, श्रीमती पल्लवी क्षीरसागर, श्रीमती बोरसे, श्रीमती सुनंदा सदावर्ते, श्रीमती अंकिता बोचरे, श्रीमती आश्विनी घोडके, श्री. निशांत जडे या सर्व शिक्षक शिक्षिकांनी आणि श्री. रमेश देवडे, श्री. विजय गायकवाड, श्री अविनाश भोंबे या सेवकांनी सक्रियपणे सहभाग घेतला.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# कृती संशोधन

कु शर्वरी सदाशिव शिंदे
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा
शिंदेमळा मोराळे केंद्र चितळी
तालुका खटाव जिल्हा सातारा

## विषय : गणित - बेरीज व वजाबाकी

संशोधनाचे शीर्षक - "बेरीज व वजाबाकीतील अचूकता आणि गती वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या कृतींचा अभ्यास"

■ प्रस्तावना : गणितातील बेरीज व वजाबाकी ही पुढील सर्व गणितीय संकल्पनांचा पाया आहे. अनेक विद्यार्थ्यांना अंक मांडणी, हातचा व उसना घेण्याच्या प्रक्रियेमुळे चुका होतात. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले खेळ, गणिती साहित्य आणि सहाध्यायी मार्गदर्शन (Peer Learning) यांच्या मदतीने ही अडचण कमी करण्याचा प्रयत्न या कृती संशोधनातून करण्यात आला.

■ समस्या : काही विद्यार्थ्यांना बेरीज व वजाबाकीची उदाहरणे अचूक व वेगाने सोडविता येत नव्हती.

■ उद्दिष्टे : बेरीज व वजाबाकीतील अचूकता वाढविणे, गणित सोडविण्याचा वेग वाढविणे. विद्यार्थ्यांमध्ये सहाध्यायी अध्ययनाची सवय निर्माण करणे, गणिताची भीती कमी करून विषयात रुची निर्माण करणे.

■ गृहितक : विद्यार्थ्यांनी तयार केलेले गणिती साहित्य, खेळ आणि परस्पर मार्गदर्शन यांचा वापर केल्यास बेरीज व वजाबाकीतील अचूकता व गती वाढेल.

■ कृती संशोधन : इयत्ता ३ री व ४ थीचे १३ विद्यार्थी

■ कालावधी : ४ आठवडे

विद्यार्थ्यांनी राबविलेल्या कृती - अंक कार्ड, संख्या पट्टी आणि फ्लॅश कार्ड तयार केली. "विद्यार्थी शिक्षक" उपक्रमांतर्गत हुशार विद्यार्थ्यांनी इतर विद्यार्थ्यांना उदाहरणे समजावून सांगितली. दररोज १० मिनिटांचा "गणित सराव कोपरा" आयोजित केला, बेरीज-वजाबाकीचे गणिती खेळ व स्पर्धा घेतल्या, जोडीने उदाहरणे सोडवून एकमेकांच्या चुका तपासल्या, दैनंदिन जीवनातील व्यवहारांवर आधारित बेरीज-वजाबाकीची उदाहरणे तयार केली, आठवड्याच्या शेवटी लघु चाचणी घेऊन प्रगतीची नोंद केली.

■ संशोधनासाठी वापरलेली साधने

पूर्वचाचणी (प्री टेस्ट )
उत्तरचाचणी (पोस्ट - टेस्ट ) निरीक्षण नोंद, विद्यार्थी प्रगती नोंदवही, स्वमूल्यांकन पत्रक

■ निरीक्षणे : विद्यार्थ्यांच्या चुका लक्षणीयरीत्या कमी झाल्या, उदाहरणे सोडविण्याचा वेग वाढला. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, गणिताबद्दलची भीती कमी झाली, विद्यार्थी एकमेकांना मदत करून आनंदाने शिकू लागले.

■ निष्कर्ष : विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले गणिती साहित्य, खेळ आणि सहाध्यायी अध्ययन पद्धतीमुळे बेरीज व वजाबाकीतील अचूकता, गती आणि आत्मविश्वासात स्पष्ट सुधारणा झाली. विद्यार्थी-केंद्रित कृतींमुळे गणित शिकणे अधिक आनंददायी आणि परिणामकारक ठरले.

■ शिफारसी : दररोज १०-१५ मिनिटे बेरीज व वजाबाकीचा सराव करावा, प्रत्येक वर्गात "गणित कोपरा" तयार करावा, विद्यार्थ्यांनी तयार केलेले गणिती साहित्य नियमित वापरावे, सहाध्यायी अध्ययन (पिर लेअरनिंग) पद्धतीचा सातत्याने अवलंब करावा.

■ घोषवाक्ये : खेळत शिकू, गणित जिंकू!
दररोज सराव - गणितात प्रभाव!
विद्यार्थी शिकवतील, विद्यार्थी घडतील!
गणित सोपे, आत्मविश्वास दुप्पट!



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## 'मामा' (माहेरचा समृद्ध दुवा)

पुढे.......

'मामाच्या गावाला जाऊया, तिथे जाऊन मजा करूया' ही बालगीतातली ओळ प्रत्येक लहान मुलाच्या आवडीची असते. मामाचं घर म्हणजे मुलांसाठी कडक शिस्तीतून मिळालेली एक हक्काची 'मुक्त शाळा'! जिथे आई-बाबांचा ओरडा नसतो, अभ्यासाची कटकट नसते; असतो तो फक्त आणि फक्त भाचेमंडळांचे लाड पुरवणारा मामा! आई जेव्हा एखाद्या गोष्टीसाठी नकार देते, तेव्हा भाचेमंडळी आपला हट्ट पूर्ण करून घेण्यासाठी ज्याच्याकडे विश्वासाने धाव घेतात, तो मामाच असतो. भाच्यांच्या आनंदासाठी स्वतः लहान मूल होणारा, सुट्ट्यांमध्ये त्यांना फिरायला नेणारा, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारणारा मामा प्रत्येक मुलाच्या बालपणाला आनंदाचे इंद्रधनुषी रंग देऊन जातो.

मामाच्या या अथांग मायेचा आणि बालपणीच्या आनंदाचा विचार करताना एका अत्यंत महत्त्वाच्या नात्याचा उल्लेख केल्याशिवाय हा लेख पूर्णच होऊ शकत नाही-ते नातं म्हणजे 'मामी'! मामा जे लाड करतो, बहिणीला धीर देतो किंवा भाच्यांच्या पाठीवर हात ठेवतो; या सगळ्यामागे 'मामीची साथ आणि तिचे औदार्य' खूप मोठे असते. मामी जर संकुचित वृत्तीची असेल, तर मामाचं घर भाच्यांसाठी कधीच उघडं राहू शकत नाही.

मामी ही केवळ मामाची पत्नी नसते, तर नावातच दडल्याप्रमाणे ती भाच्यांसाठी 'मा-मी' म्हणजे आईसारखीच दुसरी माउली असते. (क्रमशः)

# विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



## वेळ नाही, की प्राधान्य नाही?

सकाळी डोळे उघडल्यापासून रात्री डोळे मिटेपर्यंत एक वाक्य आपण किती सहज बोलतो-"वेळच नाही." आईचा फोन आला, "आता वेळ नाही." मुलगा म्हणाला, "बाबा, थोडा वेळ खेळू या?" उत्तर आलं, "आत्ता काम आहे." मित्राने भेटायचं म्हटलं, "नंतर बघू." वृद्ध वडिलांनी दोन मिनिटं बोलावं म्हटलं, "मी खूप बिझी आहे."

पण खरंच... वेळ नसतो, की प्राधान्य नसतं?
विचार करा...

दोन तास सोशल मीडियावर सहज जातात, पण आईसोबत दहा मिनिटं बसायला वेळ नसतो.
वेब सिरीजचे अनेक भाग एका रात्रीत पाहतो, पण मुलाच्या शाळेतील कार्यक्रमाला जाण्यासाठी वेळ मिळत नाही.
मोबाईलची बॅटरी १०% झाली की चार्जर शोधतो; पण नात्यांमधला जिव्हाळा संपत चालला आहे, याची जाणीवही होत नाही.
आपण म्हणतो, "एक दिवस सगळं सुरळीत झालं की भरपूर वेळ देईन."
पण आयुष्याचा नियम वेगळाच आहे.
वेळ कधीच मिळत नाही... वेळ काढावा लागतो.

कधी रात्री शांतपणे अंथरुणावर पडल्यावर स्वतःच्या मनाला हा प्रश्न विचारला आहे का, की खरंच आपल्याकडे २४ तासांतले १० मिनिटेही नसतात? की उत्तर भलतेच आहे? सत्य हेच आहे की, आपल्याकडे वेळ नसतो असे नाही, तर त्या माणसाला, त्या नात्याला किंवा त्या गोष्टीला आपल्या आयुष्यात 'प्राधान्य' (Priority) नसते! हा विचार किती कटू पण सत्य आहे ना? विचार करा, जेव्हा घरातील एखादी व्यक्ती अचानक आजारी पडते, तेव्हा आपण ऑफिसची महत्त्वाची कामे, मीटिंग्ज बाजूला ठेवून हॉस्पिटलमध्ये धाव घेतो की नाही? मग तेव्हा तो वेळ कुठून येतो?

कारण त्या क्षणी ती व्यक्ती आपले 'प्राधान्य' बनते. मग एरवी रोजच्या जगण्यात तीच आई, तोच बाप, तेच मूल आणि तोच जुना मित्र मागे का पडतात? कारण आपण त्यांना गृहीत धरलेले असते. सोशल मीडियावर तासनतास स्क्रीन स्क्रोल करायला आपल्याकडे वेळ असतो, पण थकलेल्या आईचे पाय दाबून द्यायला १० मिनिटे नसतात. ऑफिसच्या बॉसचा मेसेज एका सेकंदात पाहिला जातो, पण "जेवलास का रे?" असा विचारणाऱ्या पत्नीच्या मेसेजला 'रिप्लाय' द्यायला वेळ नसतो. आपण २४ तासांच्या चक्रात धावत राहतो, आणि अंतर्मनात एकच नकारात्मकता साचत राहते- "मी नाती जपू शकत नाहीये, मी एकाकी पडतोय."

म्हणून काम नक्की करा, यश नक्की मिळवा, स्वप्नंही पूर्ण करा. पण त्या प्रवासात आपल्या माणसांना मागे सोडू नका.

कारण आयुष्याच्या शेवटी आपण किती पैसे कमावले, किती पदं मिळवली किंवा किती मोठं घर बांधलं, यापेक्षा एकच प्रश्न मनाला छळतो-
"ज्यांच्यासाठी इतकी धडपड केली... त्यांच्यासोबत खरंच किती वेळ जगलो?"

जर त्या प्रश्नाचं उत्तर समाधान देणारं असेल, तर समजा तुम्ही आयुष्य जिंकलात.

आजचा विजयमंत्र
"जेव्हा आपल्या माणसांकडे वेळ नसतो, तेव्हा आपण गरीब असतो-खिशाने नाही, तर मनाने. कारण शेवटी आयुष्य हे किती वर्षं जगलात याने मोजलं जात नाही; तर त्या वर्षांत किती क्षण आपल्या माणसांसोबत जगलात, याने मोजलं जातं."

















































हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# आषाढ तळण : पंगोजी

ज्योतिर्मय साहित्य

हा मूळ महाराष्ट्रातील आणि मुंबईतील पाठारेप्रभूंची खास नाश्त्याची किंवा मधल्या वेळी खाण्याची लाडकी डिश !

आपल्या भारतात उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तीनही ऋतू सर्व ठिकाणी अगदी कपड्यांपासून ते सण,उत्सव,खाद्य संस्कृती या सर्व बाबतीत तितक्याच उत्साहात साजरे केले जातात. आपल्या पूर्वजानी,थोर ऋषींनी,आहारतज्ञांनी खूप अभ्यासपूर्वक त्यांचे नियोजन केले आहे ज्यामुळे सर्वांचे आरोग्य उत्तम राहते . हा आषाढ महिना म्हणजे पावसाळ्याची सुरुवात!उन्हाची काहिली संपून हलका पाऊस वातावरण एकदम बदलून उत्साही, प्रसन्न करतो.अशा वेळी गरमागरम, खमंग चमचमीत, तेलकट पदार्थ खाण्याची तीव्र इच्छा होते. दरवर्षी कापण्या, पुर्या, घारगे, शंकरपाळी असे पारम्पारीक पदार्थ सगळे

बनवून खातोच, पण थोडासा बदल म्हणून आज आपण शेकडो वर्षांपूर्वीचा पण हल्ली कमी बनवला जाणारा असा एक पारंपारीक पदार्थ किंचित बदल करून बनवू . चला मग लगेंच .. मौका भी है , मौसम भी कमाल है , तो देर किस बात की !

साहित्य :

१ वाटी तांदुळाचे पीठ, १ वाटी कणिक, कसुरी मेथी किंवा १०-१२ मेथ्या तळून त्याची पावडर, अर्धी वाटी उडीदाचे पीठ, १ इन्च आलं , ७..८ हिरव्या मिरच्या, १ चमचा धने जिरे पावडर ,१ चमचा ओवा, पाव चमचा हिंग, पाव चमचा सोडा, चवीनुसार शक्यतो सैंधव किन्वा मीठ, तळण्यासाठी तेल.

कृती :

प्रथम आले आणि मिरच्या ठेचून घेऊ. मग एका मोठ्या बाऊल मध्ये तांदुळाचे पीठ, कणिक, उडीदाचे पीठ घालून त्यात ठेचा , ओवा , हिंग , धनेजिरे , कसुरी मेथी किंवा मेथ्यांची जाडसर कुटलेली पूड घालून चवीनुसार सैंधव घालून गॅसवर कढई मध्ये ३ चमचे




तेल कडकडीत गरम करून पिठात घालावे व भज्याच्या पिठाप्रमाणे पाणी घालून व्हिस्करने किंवा चमच्याने फेटून व्यवस्थित मिक्स करून ठेवावे.

गॅसवर कढई ठेवून त्यात तळण्यासाठी भरपूर तेल घालून गरम करण्यासाठी ठेवावे. ते छान गरम होत आले की पिठात सोडा घालून पुन्हा एकच दिशेने गोलाकार फेटावे.म्हणजे सोडा छान मिक्स होईल आणि मध्ये हवा भरल्यामुळे हलके होऊन फुगेल. आता तेल मस्त गरम झालेले असेल. त्यात आधी चिमूटभर फ्राय पावडर घालावी.त्यामुळे पदार्थ तेल जास्त शोषत नाही आणि तेलकट होत नाही.

मग या पिठाची छोटी छोटी भजी चमच्याने तेलात सोडून अर्धवट तळून काढून ठेवावीत.

सर्व भाजी तळून काढून चाळणीत ठेवावीत. खाण्याच्या वेळी ही पुन्हा गरम तेलात सोडून कुरकुरीत होईपर्यंत तळावीत आणि आपल्या आवडीनुसार शेंगा ,खोबरे ,हिरवी किंवा चिंचगुळाची चटणी ,केचप यांच्याबरोबर गरम गरम खावी .

वैशिष्टय:

मूळ पंगोजीच्या पिठात मैदा आणि तांदुळाचे पीठ होते. पण सर्वांच्या तब्येतीचा विचार करून मैद्या ऐवजी कणिक आणि उडीद डाळ आपल्यासाठी खूप आवश्यक आहे , ते आपण वापरले आहे. त्यातून शरीरासाठी आवश्यक असलेले व्हिटॅमिन बी ३ मिळतेच,शिवाय प्राथीने ,कॅल्शियम भरपूर प्रमाणात मिळतात. त्यामुळे पचन क्रिया सुधारते . कॅलरीज आणि फॅट्स कमी होतात त्यामुळे वजन वाढत नाही. हाडे मजबूत होतात. लोह ,जस्त ,मॅग्नेशियम, फायबर भरपूर प्रमाणात असल्यामुळे शरीरातील ऊर्जा वाढते, त्यामुळे ताकद वाढते. मधुमेहिंसाठी ही उत्तम डाळ आहे. हृदयाचे आरोग्य उत्तम राहते.असे असंख्य गुणधर्म या डाळीत असल्यामुळे आणि चवसुद्धा या डाळीचे पीठ वापरल्याने खूप खमंग येते म्हणून याचा वापर केला आहे. मेथ्या तरी अगदी केसापासून ते पोटापर्यन्त खूपच औषधी असतोच. धने जिरे हे यातील प्रमुख आणि टेस्ट आणणारे घटक




आहेत.ओवा, हिंग पोटाच्या आरोग्यासाठी आणि पचनक्रिया व्यवस्थित होण्यासाठी उत्तम असतात. विशेषतः पावसाळ्यात हे खूप गरजेचे असतात.शिवाय त्यामुळेही चव अधिक खमंग लागते. मूळ पंगोजी मध्ये हे नाहीत, पण चवीला आणि आरोग्याला अधिक लाभदायक आहेत म्हणून यांचा वापर केला आहे. कोथिंबीर घातली तरी अजून चवीला बेस्ट लागतात. असा टेस्टी आणि खमंग पदार्थ वर्णनावरुनच पंगोजी खाण्याचा मोह अनावर होतोय ना?

मग चला लागा तयारीला. .

# क्रांतीकारी क्रोधधारी स्वातंत्र्य सैनिक गोविंद चरणकार

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

''मिट गया जब मिटनेवाला फिर सलाम आया तो क्या ?

दिल को बरबादी के बाद उनका पयाम आता तो क्या?''




'कीर्ती' मासिक आता बंद झाले आहे. त्या काळात 'कीर्ती' मासिकाच्या संपादनातील सोहन सिंग जोश यांची भूमिका क्रांतिकारी, कम्युनिस्ट आणि शेतकरी-कामगार चळवळीच्या विचारप्रसाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. सोहन सिंग जोश (१८९८१९८२) हे पंजाबमधील एक प्रमुख कम्युनिस्ट कार्यकर्ते, स्वातंत्र्यसेनानी आणि लेखक होते, आणि १९२७ मध्ये त्यांनी 'कीर्ती' मासिकाचे संपादकपद स्वीकारल्यानंतर या मासिकाचा विचार आणि दिशा ठरवण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले. गोविंद चरणकार सारखे अनेक स्वातंत्र्य सैनिकांची ऐतिहासिक नोंद या मासिकामुळे होऊ शकली, जसे केसरी आणि मराठा दैनिकांचे ऐतिहासिक महत्व अबाधित आहे. 'कीर्ती' हे पंजाबी भाषेतील मासिक फेब्रुवारी १९२६ मध्ये सुरू झाले. याचे संस्थापक गदर पक्षाचे ज्येष्ठ नेते संतोख सिंग होते, आणि हे मासिक 'कीर्ती किसान सभा'चे मुखपत्र मानले जात असे. 'कीर्ती'चा उद्देश मूलतः क्रांती, मार्क्सवादी विचार आणि सामाजिक न्यायाच्या मूळ कल्पना पंजाबच्या शेतकरी, कामगार आणि तरुण पिढीपर्यंत पोहोचवणे हा होता.१९२७ मध्ये संतोख सिंग यांच्या मृत्यूनंतर सोहन सिंग जोश यांनी या मासिकाचे संपादकपद स्वीकारले. या बदलानंतर 'कीर्ती' अधिक स्पष्टपणे मार्क्सवादी, साम्यवादी आणि शेतकरी-कामगार हित जोपासणारे माध्यम बनले.




संपादक म्हणून जोश यांनी 'कीर्ती' मासिकाच्या माध्यमातून समाजवाद, साम्राज्यवादविरोध, शेतकरी-कामगार हितसंबंध आणि ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संघर्षाचे विवेचन केले. त्यांच्या काळात मासिकाने केवळ बातम्या किंवा वृत्तांत न देता, विचारप्रधान लेख, विश्लेषणे, आणि राजकीय मार्गदर्शन देण्यावर भर दिला.

१९२७ मध्ये 'कीर्ती'ने होशियारपूर येथे होणाऱ्या एका परिषदेची माहिती दिली, जी सोहन सिंग जोश आणि भगतसिंग यांच्या नेतृत्वाखाली आयोजित होणार होती. यावरून 'कीर्ती' केवळ मासिक नव्हे, तर संघटनात्मक कामाचे आणि चळवळीच्या नेटवर्कचे केंद्र बनले होते हे दिसते. जोश यांनी मासिकाच्या माध्यमातून अनेक महत्त्वाच्या राजकीय आणि सामाजिक विषयांवर प्रकाश टाकला. उदाहरणार्थ, १९२७ मध्ये लाहोरमध्ये झालेल्या जातीय दंगलीवर भगतसिंगांनी 'कीर्ती' मार्फत प्रतिक्रिया व्यक्त केली होती, आणि सोहन सिंग जोश यांच्या संपादकीय मार्गदर्शनाखाली मासिकाने अशा विषयांना प्रसिद्धी दिली.

सोहन सिंग जोश आणि भगतसिंग यांचे संबंध जवळचे होते. भगतसिंगांनी 'कीर्ती'च्या संपादकीय मंडळातही काम केले, आणि त्यांनी या मासिकासाठी अनेक लेख लिहिले. जोश यांच्या संपादकीय मार्गदर्शनाखाली 'कीर्ती' हे क्रांतिकारी विचारसरणीचे एक प्रमुख माध्यम बनले, ज्यामुळे भगतसिंगांसारख्या तरुण क्रांतिकारकांना आपले विचार मांडण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ मिळाले. भगतसिंगांनी 'काकोरी के वीरों से परिचय' सारख्या लेखमालेतून काकोरी क्रांतिकारकांची ओळख करून दिली, आणि हे लेखन 'कीर्ती'च्या माध्यमातून प्रसिद्ध झाले. जोश यांच्या संपादकीय धोरणामुळे अशा लेखनाला सुरक्षित आणि प्रभावी माध्यम मिळाले. सोहन सिंग जोश यांच्या संपादकीय काळात 'कीर्ती' मासिकाने केवळ क्रांतिकारी विचारच नव्हे, तर शेतकरी आणि कामगार हितसंबंध, वर्गसंघर्ष, सामाजिक न्याय आणि साम्राज्यवादविरोधी विचार यांचाही प्रचार केला. यामुळे पंजाबमधील तरुण पिढी, शेतकरी आणि कामगार यांच्यात राजकीय जागृती वाढली. जोश यांनी मासिकाच्या माध्यमातून मार्क्सवादी विचारसरणीचा प्रसार केला, आणि क्रांतिकारी चळवळीला एक विचारसंपन्न आणि सैद्धांतिक पाया दिला. त्यामुळे 'कीर्ती' केवळ एक मासिक नव्हे, तर एक विचारप्रवाह आणि चळवळीचे प्रतीक बनले. सोहन सिंग जोश आणि शहीद भगतसिंग यांनी क्रांतिकारी स्वातंत्र्य सैनिकांना न्याय देण्याचे ऐतिहासिक काम केल्यामुळेच गोविंद चरणकार यांच्यासारख्यांचा भारत देश स्वंतंत्र होण्यामधील त्याग संस्मरणीय ठरला आहे.

# निखळ आनंदाच नातं- मैत्रीचं...

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

या दिवशी मैत्रीचे निरनिराळ्या प्रकारचे आकर्षक धागे,शुभेच्छापत्र,आता काही वर्षांपासून वॉट्सप वर

शुभेच्छा संदेश, फेसबुकवर संदेश दिले जातात.

एकत्रित भोजनाचे बेत आखले जातात.

एकमेकां पासून दुर असतील तर फोन वरुन बोलून जवळीक साधली जाते.

अमेरिकेत सरकारने एका माणसाला ठार मारले. त्याचा एक मित्र होता,त्याला मित्राचे मरणाचे दुःख झाल्याने जीवन संपवले.त्याच्या स्मरणार्थ हा दिवस १९३५ पासून मित्रता दिवस ''फ्रेन्डशिप डे'' साजरा होऊ लागला.

मैत्री कशी असते ह्या विषयीच्या दोन गोष्टी बघा, घट्ट मैत्री कशी असते....




जेव्हा छ.शिवाजी महाराजांनी किल्ले हाती घेण्याची मोहीम चालवली तेव्हा प्रत्येकवेळी तानाजी आघाडीवर होते. शिवाजी महाराजांच्या सैन्यात अनेक शूरवीर असतानाही जेव्हा कोंडाणा जिंकून आणण्याची वेळ आली तर महाराजांच्या मनात एकच नाव होते ते म्हणजे तानाजी मालुसरे.

इतिहासातील हे युद्ध सिंहगडची लढाई म्हणून नोंदवले गेले आहे. तेव्हा ते कोंडाणा म्हणून ओखळले जात होते. शिवाजी महाराजांचे परममित्र तानाजी मालसुरे आपल्या मुलाच्या लग्नाच्या तयारीत व्यस्त असताना हे सर्व घडले होते. कोंडाणा किल्ल्यासह २३ किल्ले पुरंदर करारामध्ये मुघलांना सोपविल्यानंतरही मोगल सल्तनत तहान भागली नव्हती. औरंगजेबाने आपला विश्वासू उदयभानु राठोड यांना कोंडाणा किल्ल्याकडे पाठवून मराठा साम्राज्य नष्ट करण्याचा नेम धरला होता.तेव्हा शिवाजी महाराजांना आपल्या शूर व प्रिय मित्राला युद्धाच्या घटनेत सामील करायचे नव्हते, कारण तानाजीच्या घरी लग्नाची तयारी सुरु होती. पण स्वराज्य आणि शिवाजी महाराजावर संकट आल्याचे कळले तर तानाजींनी मुलगा रायबाच्या लग्नाची पर्वा न करता भगवा परिधान केला. अत्यंत कठीण प्रसंगी राज्यासाठी कामास येण्यापेक्षा मोठे भाग्य काय असावे असा विचाराने तानाजींची छाती गर्वाने फुलून गेली.आधी लग्न उरकून घेऊ, मग कामगिरीसाठी निघू असे शेलार मामांनी म्हटल्यावर तानाजींनी उत्तर दिले की ''आधी लगीन कोंढाण्याचे मग लगीन रायबाचे''. तानाजी जिजाऊंना भेटून रायबाची जबाबदारी शिवाजी महाराजांच्या हाती देऊन म्हणाले की कोंढाण्याहून परतलो तर मी मुलाचे लग्न लावेन आणि जर मेलो तर तुम्ही त्याचे लग्न लावून द्या.

४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजी मालुसरे यांच्या नेतृत्वाखाली राजगडावरुन मराठा सैन्य निघाले. आपले प्राण पणाला लावून कोंडाणा ताब्यात घेतला. महाराजांना विजयाची बातमी कळताच आनंद झाला पण तानाजींनी प्राण गमावले कळताच त्यांचे अश्रु अनावर झाले आणि त्यांच्या तोंडून उद्गार निघाले- गड आला पण सिंह गेला...

मित्र म्हणजे असा धागा,
मोकळं व्हावं अशी जागा,
कोणतच नाटक नाही....




प्रत्येकाच्या आयुष्यात असे मित्र मैत्रिणी असतातच.. तर असाच एक मित्र म्हणा, मैत्रीण म्हणा आपल्या सर्वांच्याच आयुष्यात आहे! कोण बरं?? तर ते म्हणजे पुस्तक! पुस्तकाशी मैत्री. ही पुस्तके लहानपणापासून तर शेवट पर्यंत बाल साहित्यापासून तर भगवद् गीतेपर्यंत साथ देणारी ही जिवाभावाचे मित्र- मैत्रीण! आपल्या एकटेपणात आपला साथ देणारी...

अजून...

मैत्री हा शब्द आठवताच प्रथम डोळ्यांसमोर उभी राहते ती कृष्ण-सुदामा यांची मैत्री. महाभारताच्या काळातली ही मैत्री. पण भारताच्या इतिहासात ती अमर होऊन बसली. कृष्ण श्रीमंत होता; तर सुदामा गरीब होता. कृष्ण देखणा, बलवान; तर सुदामा हडकुळा, खंगलेला आणि रूपाने सामान्य. पण दोघांची घनदाट मैत्री झाली. सांदिपनी ऋषींच्या आश्रमात गुरुगृही दोघेही शिक्षण घ्यावयास आले. त्या आश्रमात त्यांची इतकी मैत्री झाली की, एकमेकांशिवाय एकमेकांना चैन पडायचे नाही. कृष्ण मनानं इतका मोठा, इतका उदार की त्याने आपला मित्र एक दरिदी भिक्षुक ब्राह्मण आहे याचा कधी विचारही केला नाही.

आश्रमातले दिवस संपले. पुढे श्रीकृष्ण द्वारकेचा राजा झाला. सुदाम्याच्या कानी त्याची किर्ती साहजिकच पडली. त्याला कृष्णाला भेटायची, बघायची इच्छा झाली. तो द्वारकेला आला. राजवाड्याच्या दाराशी भीत भीत उभा राहिला. पहारेकरी ओरडले. त्याला आत जाऊ देईनात. कृष्णाने विचारले कोण आहे रे तिकडे? सुदामा थरथर कापत म्हणाला, मी सुदामा... सुदामा हे नाव कानी पडताच कृष्ण धावत आला आणि त्याने सुदाम्याला कडकडून मिठी मारली. प्रेमाने आत नेऊन आपल्या सिंहासनाशेजारी बसवले आणि विचारले, काय भेट आणलीस माझ्यासाठी? सुदाम्याने लाजत लाजत अंगावरला पंचा पुढे केला. त्यात पोह्यांची पुरचुंडी होती.

कृष्णाला आवडणारे पोहे सुदाम्याने आठवणीने त्याच्यासाठी आणले होते. कृष्णाने अधाश्यासारखे ते पोहे खाल्लेत. त्याच्या हृदयात गहिवर दाटून आला. डोळ्यात पाणी उभे राहिले. म्हणाला, सुदामा, किती रे तुझे माझ्यावर प्रेम. अरे, मला पोहे आवडतात हे लक्षात ठेवून तू प्रेमाने मला पोह्यांची भेट दिलीस!

कृष्ण-सुदाम्याच्या मैत्रीची ही कथा! पण तिचे नुसते स्मरण झाले तरी डोळ्यात पाणी येते. दोन व्यक्तीं मध्ये मैत्रीची भावना केवढी महान असू शकते हे ही कथा सिद्ध करते. खरोखर, मैत्री किती श्रेष्ठ आहे. एकमेकांच्या प्रगतीची आणि समृद्धीसाठी एकमेकासाठी प्रयत्न असणे

तसेच आनंद असणे हीच मैत्री आहे.

प्रत्येक माणसाला मित्र हा हवाच ! पुरुषाला मित्र आणि स्त्रीला मैत्रीण म्हणजे एक आधार असतो. सुप्रसिद्ध लेखिका विभावरी शिरुरकरांनी एके ठिकाणी असे लिहिले आहे की शंभर मैत्रिणींपेक्षा स्त्रीला एक पुरुष मित्र अधिक आवडतो !

असा मैत्रीचा धागा जपू या....

सर्वांना मैत्री दिवसाच्या शुभेच्छा !

# कवितेच्या लाटावर...


कवितेच्या लाटावर...










हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# डॉ. शेख बेस्ट आयुर्वेदिक डॉक्टर ऑफ छत्रपती संभाजीनगर या पुरस्काराने सन्मानित

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - छत्रपती संभाजीनगर येथील नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरीचे संचालक डॉ.ए.एच शेख यांना आयुर्वेदिक क्षेत्रात विशेष कार्य केल्या बद्दल नवभारत समूहा तर्फे बेस्ट आयुर्वेदिक डॉक्टर ऑफ छत्रपती संभाजीनगर या पुरस्काराने दि.२९ जुलै २०२६ रोजी हॉटेल ताज, मुंबई येथे सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना मिस शैना एनसी (नॅशनल स्पोर्टस् अॅन्ड नॅशनल सेक्रेटरी वर्ल्ड चेअरमन जायंटस् वेलफेअर फाऊंडेशन), मिस हरनाज कौर संधू (सिनेअभिनेत्री व मिस युनिवर्स -२०२१), श्री. प्रकाशराव अवितकर (कॅबिनेट मिनीस्टर, पब्लिक हेल्थ अँड फॅमिली ऑफ महाराष्ट्र) व श्री. निमिश माहेश्वरी (मॅनेजिंग डायरेक्टर, नवभारत ग्रुप) यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार डॉ. शेख याना प्रदान करण्यात आला. डॉ. शेख यांनी मागील ३८ वर्षात विविध लैंगिक समस्याग्रस्त असलेल्या २ लाखापेक्षा अधिक रुग्णांवरती यशस्वी उपचार केले असून अनेक रुग्णांना त्यांच्या या उपचाराने त्यांच्या वैवाहिक जीवनात नवसंजीवनी मिळाली आहे. एक सामाजिक उपक्रम म्हणून मागील ३८ वर्षापासून




विविध लैंगिक समस्याग्रस्त असलेल्या गरीब रुग्णांसाठी दर रविवारी मोफत तपासणी शिबिरे ते आयोजित करतात तसेच प्रसिद्ध आणि नामांकित आयुर्वेदिक कंपनीचे औषधी अत्यंत कमी खर्चात देऊन त्यांच्यावर उपचार करतात, त्यांना आतापर्यंत देश-विदेशातील विविध सामाजिक संस्थांनी २२५ पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित केले आहे. लहानपणीच्या चुका मोबाईलवर अश्लील चित्रे पाहून लागलेली लैंगिक व्यसनात, एड्स पासून दूर राहण्यासाठी त्यांनी पथनाट्ये, भीतीपत्रके व विविध वर्तमानपत्रामध्ये लेख व बातम्या देऊन प्रबोधन व जनजागृती केली आहे, त्यांच्या या कार्याची दखल घेऊन नवभारत समूहाने ''बेस्ट आयुर्वेदिक डॉक्टर ईन छत्रपती संभाजीनगर'' हा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे.

# प्रा. विठ्ठल बरसमवाड कलम रत्न पुरस्काराचे मानकरी

**ज्योतिर्मय साहित्य**



मुखेड - आर्यारवी एंटरटेनमेंट संस्था दादर (पूर्व) मुंबई यांच्या तर्फे साहित्य क्षेत्रातील योगदाना बद्दल कलम रत्न पुरस्कार दर वर्षी दिले जातात. यावर्षीचा अतिशय सन्मानाचा कलम रत्न पुरस्कार ग्रामीण भागात शिक्षण घेऊन आपल्या कर्तृत्वाने ११ ग्रंथ व ५१५ लेख वृत्तपत्र, दीपावली अंक, साप्ताहिक यामध्ये लिहिणारे व २२९ पेक्षा जास्त शैक्षणिक, सामाजिक, आध्यात्मिक विषयावर व्याख्यान दिलेले साहित्यिक म्हणजेच प्रा.विठ्ठल गणपतराव बरसमवाड यांना दिलेला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय लेखन कार्याची दखल या सेवाभावी संस्थेने घेतलेली आहे.

आज पर्यंत विठ्ठल बरसमवाड यांना पुढील राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये राजे मल्हारराव होळकर पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, मराठी भाषा रत्न पुरस्कार, शब्दगंध साहित्यिक परिषद आहिल्या नगर यांच्याकडून साहित्य कार्य गौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आले. तसेच त्यांच्या ग्रंथा नाही पुरस्कार मिळाले.आणि अहिल्यानगर आकाशवाणी केंद्रावर त्यांची प्रकट मुलाखत झाली. विठ्ठल बरसमवाड यांची सेवा २४ वर्षे पूर्ण झाली आहे. सध्याचे महात्मा गांधी विद्यालय येळी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथे सेवेत कार्यरत आहेत. ते इतिहास विषयाचे अध्यापन करतात. विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांना सर्वत्र ओळखले जाते. विद्यार्थी व समाजाशी नाते अतूट असणाऱ्या गुणवंतांचा आम्ही नेहमीच गौरव करतो. असे आर्या रवी एटरनेटमंट संस्था (पूर्व) मुंबईचे आयोजक श्री महेश्वर भिकाजी तेटांबे अभिनेते व पत्रकार असून समन्वय श्री गुरुनाथ तिरपणकर, श्री केतन भोज, श्री राहुल खरात यांनी सांगितले. कलम रत्न हा पुरस्कार मिळाल्या बरोबर पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सर्वच स्तरातून त्यांच्या वर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# ७५ कविता संग्रहाचे पुस्तक ''लढा''माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी व नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी यांना गुरुपौर्णिमा दिनी भेट

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर : मराठवाड्याचे जेष्ठ बाल साहित्यिक व सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी, समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या''लढा''या कविता संग्रहात जीवनातील विविध क्षेत्रातील महिला, पुरुष, सैनिक, दिव्यांग, शेतकरी. शेत मजूर, कामगार, जेष्ठ नागरिक, तरुण, तरुणी यांच्या जीवनात येणारे प्रश्न, गंभीर समस्या यांच्याशी लढताना ज्या व्यथा येतात त्या काव्य रुपात लिहून दाद मागणाऱ्या

कविता आहेत. या कविता संग्रहात ७५ कविता आहेत. हा कविता संग्रह नुकताच उपलब्ध झालेला आहे. कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी गुरू पौर्णिमा बुधवार (ता,२९) दिनी सदरील काव्य संग्रह''लढा'' माजी



नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी व विद्यमान नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांना शिवराणा व्यायाम शाळेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात भेट म्हणून दिला. या समयी व्यायाम शाळेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी भवन येथे साहित्य रत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांना जयंती निमित्त अभिवादन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - दिनांक एक ऑगस्ट रोजी सेवन हिल जवळील राष्ट्रवादीच्या कार्यालयामध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष अनिल हजारे पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी सेवा दलाचे प्रदेश उपाध्यक्ष दशरथ मानवतकर यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की अण्णाभाऊंनी समाजामध्ये ज्या व्यथा बघितल्या ते त्यांनी आपल्या साहित्यामध्ये मांडल्या त्यांच्या प्रत्येक कथा कादंबरीमध्ये कष्टकरी, कामगार, भटके, महिलांचे रक्षण अशा वेगवेगळ्या व्यथा त्यांच्या कादंबरीमध्ये जिवंत केल्या अण्णाभाऊ फक्त त्यावरच थांबले नाही तर त्यांनी मुंबई महाराष्ट्रा मध्ये राहावी म्हणून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये भाग घेऊन संपूर्ण महाराष्ट्र जागृत




केला त्यांचा जीवनाचा प्रवास अत्यंत कठीण परिस्थिती सुरू होऊन तो रशियापर्यंत पोहोचला त्यांनी या देशातील थोर महापुरुषांचे महत्त्व साता समुद्रा पलीकडे सांगून महाराष्ट्राचा नव्हे तर देशाचा अभिमान वाढवला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवा दलाचे शहराध्यक्ष यादवराव सूर्यवंशी यांनी केले या कार्यक्रमास सेवा दलाचे बालासाहेब भांगे मल्हारराव डोणगावकर, राजकुमार गोगे आयुष मानवतकर, अक्षय मानवतकर इत्यादी उपस्थित होते.

# वर्षा सहल

**ज्योतिर्मय साहित्य**



पाण्याला जीवन म्हणतात हे उन्हाळ्याची सांगता होताना लक्षात येते. सारेच चातका सारखी पावसाची वाट पहात असतात. लहान मुले तर ये रे येरे पावसा, तुला देतो पैसा म्हणत त्याला आमिष दाखवतात,तर लगान मधील घन नं घन मेघा बरसे सारखी सर्वांची अवस्था होते. एरवी कुणाच्या हातून चुकून चार थेंब पाण्याचे पडले तर चिडणारे आपण पावसाच्या पाहिला थेंब अंगावर पडताच गुलाबपाणी पडल्यासारखे मोहरून,आनंदून जातो. कितीही थकलेले असलो तरी हात,पाय, तोंड पाण्याने धुतले की सगळा थकवा लगेच दूर जातो. लहान मुलांनाच काय, मोठ्यांना सुद्धा पावसात भिजायला खूपदा आवडते. रंगीबेरंगी छत्र्या,रेनकोट यांनी रस्ते फुलून जातात. उन्हामुळे तापलेल्या धरणीवर पावासाचे काही थेंब पडतांच मातीचा जो सुगंध आसमंतात दरवळतो तो इतका सुरेख असतो, की जगातील कोणतेही परफ्युम,अत्तर,सुगंधी एअरफ्रेशनर्स त्यापुढे नक्कीच फिकी पडतात. माणसेंच काय, पशु,पक्षी सुद्धा पावसाने खुश होतात! नाचू लागतात. नाच रे मोरा किंवा थुई थुई नाच माझ्या अंगणात मोरा.. अशी गाणीसुद्धा त्यामुळेच लिहिली गेली. कित्ती चित्रपटात सुंदर पावसाची गाणी लिहिली, चित्रित केली आहेत. एकूणच पावसाळा हा सर्वांचाच लाडका ऋतू आहे.

हा पाऊस जणु जादुची कांडीच फिरवतो आणि क्षणात निसर्गाचे रूपच बदलते. उन्हामुळे रखरखीत झालेली धरणीमाता

हिरवागार शालू नसते. त्यावर सुरेख रंगीबेरंगी फुलांची वेलबुट्टी असते. त्यांचा सुगंध सारा आसमंत भरून टाकतो. पाण्यासाठी होणारी लोकांची वणवण थांबते. सारेच तृप्त होतात. बळीराजाने नुकत्याच केलेल्या पेरणीला सुरेख अंकुर फुटतात. तो ही सुखावतो. गुरे हिरवागार चारा मिळाल्यामुळे खुश होतात. निसर्गाच्या सौंदर्याला नवसंजीवनी देणारा ऋतू आहे. काळेभोर ढग, रिमझिम सरी, हिरव्यागार डोंगररांगा, फेसाळणारे धबधबे आणि मातीचा दरवळणारा सुगंध यांमुळे संपूर्ण सृष्टी जणू नव्या उत्साहाने बहरून जाते. अशा रम्य वातावरणाचा मनमुराद आनंद घेण्यासाठी आणि हे मोहरलेले सुरेख रूप न्याहाळण्याचा मोह तर सर्वांनाच होणार ना! म्हणूनच मग सारे

वर्षा सहलीचे प्लॅनिंग करतात.प्रत्येकाच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय अनुभव असतो.

या सहली शाळांच्या,कॉलेजच्या, कंपनी ऑफिसेस मधील कर्मचार्यांच्या असतात तर कधी काही प्रवासी कंपन्यासुद्धा यांचे सुंदर ठिकाणी आयोजन करतात. यशिवाय घरगुती फॅमिली ट्रीप तरी सुरूच असतात.

या सहलीत एकत्र जमून गप्पागोष्टी,गाणी, डान्स,अंताक्षरी, दमशेरा यासारखे कित्येक खेळ खेळले जातात. प्रवास करताना गप्पा, गाणी, विनोद आणि हास्याने वातावरण प्रसन्न होते.वाटेत दिसणारी हिरवीगार शेते, धुक्याने वेढलेले डोंगर, खळखळ वाहणारे ओढे आणि पावसाच्या सरींनी सजलेला परिसर पाहताना मन आनंदाने भारावून जाते. यातुन सहकार्याची भावना, मैत्री आणि एकोपा अधिक दृढ होतो.


सौ हेमा मुश्रीफ, पुणे

काहीजणांना पाण्यात उड्या मारायला, गच्च भिजायला आवडते,तर काहीना एके ठिकाणी शांतपणे बसून निसर्गाचा आस्वाद घ्यायला आवडते. चित्रकार कुंचल्याने हे रूप चितरतात तर कवींना, लेखकाना कित्येक नवीन कल्पना स्फुरतात. या ऋतुमध्ये स्वच्छ,सुंदर,प्रसन्न निसर्गाची रुपे सतत बदलत असतात. कधी काळ्याभोर ढगानी आकाश भरते,तर दुसऱ्याच क्षणी आकाशात वीजा लखलखतात,पाऊस कोसळतो. रंगीबेरंगी फुले,पाने,धबधबे, त्याचबरोबर विविध पशु,पक्षी दिसतात! फोटोग्राफीची आवड असणाऱ्यांना तर हा मौसम म्हणजे एक पर्वणीच वाटते.

गड,किल्ल्ले,दुर्ग यांची सहल या दिवसात एकदा तरी मुलांसह आवर्जून करावी. त्यामुळे मुलांना ऐतिहासिक वास्तूंची ओळख तर होतेच,पण उंचावरून निसर्ग, हिरवागार परिसर खूप सुरेख दिसतो. मुख्य म्हणजे त्या काळी अशा मुसळधार पावसात शिवाजी महाराजांसहित सर्व मावळे, लोकांनी किती कष्ट सोसले असतील याची जाणीव होते,आणि आपल्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी आयुष्यभर

सोसलेली संकटे, हालअपेष्टा याची जाणीव

होते. ऊर भरून येतो, मान अभिमानाने अधिक उंचावते निसर्गा इतके उदात्त असणाऱ्या शिवाजी महाराजांसमोर आपण नतमस्तक होतो.

पण हा आनंद घेत असतानाच या सहलीत

काही अडचणी सुद्धा असतात. सर्वांनांच याचा आनंद घेण्याची इच्छा असल्यामुळे

लहान, मोठ्या गाड्या काढून सगळेच बाहेर पडतात. त्यामुळे विशेषतः सुट्ट्या

असल्यावर, विकएन्डला तरी ट्राफिक जाम

होते. कित्येक तास गाड्या अडकून पडतात. इंधनाचा अपव्यय होतो, सगळे रिसॉर्ट्स फुल असतात किंवा खूपच महाग असतात. अशावेळी खूपच चिडचिड होते, त्रास होतो. सगळ्यांना आजच बाहेर पडायचा मुहूर्त मिळाला आहे का? असे वाटते,पण आपणही त्यातलेच एक आहोत हे सोयीस्कर पणे विसरतो तेंव्हा.

त्यातून रस्त्याच्या दुतर्फा असलेले फेरीवाले ही तर एक वेगळीच गोष्ट आहे. खरंतर त्यामुळे कित्येकाना यातून पैसे मिळतात, गरीबांची पोटे भरतात, त्यांनाही लांबून विक्रीचे साहित्य आणावे लागत असते. मग त्यातून ते थोडा फार नफा काढणारच ना! पण असा विचार कुणीच करत नाही, मिळेल त्याचा आस्वाद घ्यायचा सोडून गावात गावात किती स्वस्त असते, इथे त्याचेच दीडपट, दुप्पट पैसे घेतात असे म्हणत ते नाईलाज म्हणून घेतातसुद्धा आणि वर त्यांना बोलच लावतात. आपल्यालाच त्याचा त्रास होतो, हे लक्षातच येत नाही त्यावेळी! त्यात पावासामुळे दरड कोसळणे, किंवा पुलावर खूप पाणी येणे, पूर येणे असेही घडणारच

नैसर्गिकच आहे ना हे ? पण ते लक्षात नं घेता अशावेळी त्यामुळे जास्तच चिडचीड होते. मग या ट्रिपचे प्रयोजनच काय असा प्रश्न पडतो.

दुसरी एक महत्वाची गोष्ट म्हणजे कित्येक ठिकाणी धोका आहे,सावधान, काळजी घ्या, किंवा कुठे जाण्यास मनाई असल्याचे बोर्ड लावलेले असतानासुद्धा सुशिक्षित माणसेही आनंद मिळवण्याच्या नादात हटकून ते धुडकावून लावून तिथे जातात आणि मोठ्या समस्या स्वतः निर्माणकरून संकटे ओढवून घेतात. फोटो काढावेत पण त्याचेही भान ठेवणे गरजेचे असते. नको त्या अवघड जागी जाऊन फोटो, सेल्फी काढण्याच्या नादात किंवा स्टंट करण्याच्या नादात कित्येकदा जीव सुद्धा गमावले जातात. दररोज आपण बातम्यातून अशा गोष्टीं पाहतो, ऐकतो. दुर्दैवाने अपघात झाल्यामुळे मृत्यू झाला तर गोष्ट निराळी, पण हे नियम नं पाळता मजा म्हणून स्टंट करणे म्हणजे स्वतःनेच संकटाला आमंत्रण देणेच आहे, नाही का? शिवाय लोक मजा करण्यासाठी म्हणून येतात, सुंदर निसर्गाचा आनंद लुटतात पण त्याच वेळी ठीक ठिकाणी कचरा टाकून, खाण्याचे पदार्थ, कागद, युज अँड थ्रो च्या कित्येक वस्तू कुठेही फेकतात आणि या सुंदर निसर्गालाच विद्रुप करतात. त्याचे त्यांना वाईट सुद्धा वाटत नाही याची खंत वाटते. प्रत्येकानेच जर कचरा फक्त कचरापेटीत टाकण्याच संकल्प केला तर आणि सगळे नियम पाळले तर आपला या सहलीतील आनंद नक्कीच वाढेल. चला, वर्षा सहलीला जाऊ, आणि मनमुराद आनंद लुटू.

# आकड्यांचे मायाजाल : जगणं मोजायचं की अनुभवायचं?

**ज्योतिर्मय साहित्य**

शून्यापासून सुरू झालेला प्रवास..

''नॉट एव्हरीथिंग दॅट कॅन बी काउंटेड काउंट्स, अँड नॉट एव्हरीथिंग दॅट काउंट्स कॅन बी काउंटेड .''

अल्बर्ट आइन्स्टाईन

या एका वाक्यात आपल्या संपूर्ण आधुनिक जीवनाचं तत्त्वज्ञान सामावलेलं आहे. आज आपण ज्या गोष्टी मोजू शकतो, त्यांनाच महत्त्व देतो; आणि ज्या गोष्टी खऱ्या अर्थाने आयुष्य समृद्ध करतात, त्या मोजता येत नाहीत म्हणून नकळत दुर्लक्षित करतो.

सकाळी मोबाईलचा गजर वाजतो आणि आपल्या दिवसाची सुरुवात होते. घड्याळात ६:००, मोबाईलची बॅटरी ८७%, हवामान २९, रक्तदाब १२०/८०, वजन ७२ किलो, ऑफिसची मीटिंग ९:३०, बँकेतील शिल्लक, महिन्याचा ईएमआय, दिवसातील स्टेप्स, रात्रीची झोप दिवस संपेपर्यंत आपण जणू आकड्यांच्या अदृश्य तुरुंगात जगत असतो.

एक क्षण थांबून स्वतःलाच प्रश्न विचारूया - आपण आयुष्य जगतो आहोत, की फक्त त्याचा हिशेब ठेवतो आहोत?

हा प्रश्न जितका साधा वाटतो, तितकाच तो अस्वस्थ करणारा आहे.

आकडे हे मानवजातीच्या सर्वात महान शोधांपैकी एक आहेत. पण त्यांचा जन्म नेमका कसा झाला?

मानव जेव्हा शिकारीच्या आणि भटक्या जीवनात होता, तेव्हा त्याला ''पाच'' किंवा ''दहा'' या संकल्पनाही माहीत नव्हत्या. त्याला एवढंच समजत होतं''जास्त'' आणि ''कमी''. शिकारीला गेलेल्या टोळीतील प्रत्येक व्यक्तीसाठी एक दगड ठेवणे, गुहेच्या भिंतीवर रेघा मारणे किंवा प्राण्यांच्या हाडांवर खाचा पाडणेहीच त्याकाळची गणिताची भाषा होती.

हळूहळू शेती आली, व्यापार सुरू झाला आणि माणसाला लक्षात आलं की विश्वास टिकवायचा असेल, तर मोजमाप अचूक असलं पाहिजे. त्यातून मेसोपोटेमिया, इजिप्त, ग्रीस आणि रोम या संस्कृतींनी स्वतःच्या अंकपद्धती विकसित केल्या.

परंतु गणिताला आत्मा दिला तो भारताने.

भारतीय विद्वानांनी स्थानिक मूल्य पद्धती (प्लेस व्हॅल्यू सिस्टिम ) विकसित केली. ब्राह्मी अंकांपासून पुढे विकसित झालेली अंकपद्धती अरब व्यापाऱ्यांमार्फत जगभर पोहोचली आणि आज संपूर्ण जग ज्या अंकांचा वापर करते, त्यांना ''हिंदू-अरबी अंकपद्धती'' (हिंदू - अरबीक नुमेरल सिस्टिम ) म्हणून ओळखलं जातं.

भारतीय गणिताने जगाला दिलेली सर्वात अमूल्य देणगी म्हणजे ''शून्य''.

शून्य हा केवळ एक अंक नाही; तो एक क्रांती होता. त्याशिवाय संगणक निर्माण झाले नसते, अंतराळ संशोधन घडलं नसतं, इंटरनेट अस्तित्वात आलं नसतं आणि आधुनिक विज्ञानाचा पाया उभाच राहिला नसता.

म्हणूनच फ्रेंच गणितज्ञ पिअर-सिमॉन लाप्लास यांनी भारतीय अंकपद्धतीबद्दल लिहिलं होतं





''भारताने आपल्याला अशी पद्धत दिली, ज्यामुळे कोणतीही संख्या केवळ दहा चिन्हांत व्यक्त करता येते. मानवी बुद्धीच्या इतिहासातील ही सर्वात महान शोधांपैकी एक आहे.''

आकड्यांनी मानवाची प्रगती घडवली; पण काळाच्या ओघात एक विचित्र बदल झाला.

जे आकडे माणसाच्या सेवेसाठी निर्माण झाले होते, तेच आज माणसाचे मालक बनले आहेत. पूर्वी आकडे आपल्या खिशात होते; आता ते आपल्या डोक्यात राहतात.

पूर्वी आपण वेळ पाहण्यासाठी घड्याळ वापरायचो; आता घड्याळ आपल्याला सांगतं की आपण किती झोपलो, किती चाललो, किती कॅलरी खर्च केल्या, आजचा स्कोअर किती आहे.

तंत्रज्ञानाने आपल्याला माहिती दिली;




पण नकळत त्याने आपल्याला सतत स्वतःचं मूल्यमापन करण्याची सवयही लावली.

भगवान बुद्ध म्हणाले होते

''तृष्णा हे दुःखाचे मूळ आहे.''

आजच्या काळात त्या वाक्याला एक नवी छटा लाभली आहे.

आज दुःखाचं मूळ केवळ तृष्णा नाही; तर तुलना आहे.

आणि तुलना जन्माला येते ती आकड्यांतून.

ज्या दिवशी माणसाने स्वतःची तुलना दुसऱ्याशी सुरू केली, त्या दिवशी आकडे हे फक्त गणित राहिले नाहीत; ते अहंकार, स्पर्धा, असुरक्षितता आणि न्यूनगंड यांची भाषा बनले.

आज आपण आपल्या आनंदाची किंमत स्वतःच्या मनाने ठरवत नाही; ती दुसऱ्याच्या आकड्यांशी तुलना करून ठरवतो.

त्याचा पगार किती? तिचे फॉलोअर्स किती?

त्याच्या पोस्टला किती लाइक्स?

त्याचं पॅकेज किती? त्याची नेटवर्थ किती?

आणि या प्रश्नांच्या गर्दीत एक प्रश्न मात्र कायम हरवतो

''तो माणूस खरोखर आनंदी आहे का?''

बहुतेक वेळा या प्रश्नाचं उत्तर कोणाकडेच नसतं.

कबीरांनी एक अत्यंत अर्थपूर्ण ओळ लिहिली आहे

''साईं इतना दीजिए, जामे कुटुंब समाय;

मैं भी भूखा न रहूँ, साधु न भूखा जाय.''

कबीरांना आकडे नको होते; त्यांना पुरेपूरपणा हवा होता.

आज मात्र आपल्या शब्दकोशातून ''पुरेसं'' हा शब्द नाहीसा झाला आहे.

त्याची जागा ''आणखी'' या शब्दाने घेतली आहे.

आणि त्या ''आणखी''चा हिशेब ठेवण्यासाठी आपण आयुष्यभर आकड्यांची बेरीज-वजाबाकी करत राहतो.

जन्मापासून मृत्यूपर्यंत आकड्यांची कैद

माणसाच्या आयुष्यातील सर्वात विलक्षण गोष्ट म्हणजे, त्याचा आकड्यांशी परिचय जन्मानंतर होत नाही; तो जन्माआधीच सुरू झालेला असतो.

गर्भधारणेच्या कितव्या आठवड्यात बाळाची वाढ किती झाली, हृदयाचे ठोके किती आहेत, वजन किती ग्रॅम आहे, अपेक्षित प्रसूतीची तारीख कोणती... या आकड्यांतूनच एका नव्या जीवाची वाटचाल सुरू होते. अर्थात, हे आकडे आवश्यक असतात; कारण ते आरोग्य जपतात. प्रश्न आकड्यांचा नाही, तर त्यांच्या अतिरेकाचा आहे.

जन्म झाला की बाळाचे वजन, उंची, अपगार स्कोर , लसीकरणाच्या तारखा, कितव्या महिन्यात पालथं पडलं, कितव्या महिन्यात चालायला लागलं, कितव्या महिन्यात बोललं... प्रत्येक टप्पा एका आकड्यात बंदिस्त होतो.

जणू बालपण हे अनुभवांचं नसून, माइलस्टोन्सचं प्रोजेक्ट रिपोर्ट बनतं.

शाळेच्या पहिल्या दिवशी मुलाला अक्षरांपेक्षा आधी आकड्यांची ओळख होते.

पहिली चाचणी... पहिले गुण... पहिला क्रमांक...

आणि नकळत त्याच्या मनात एक समीकरण कोरलं जातं

**(क्रमशः)**